RNI No. MAHBIL /2009/40124

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

वर्ष ३, अंक २२] शुक्रवार, ऑगस्ट ११, २०१७/श्रावण २०, शके १९३९ [पृष्ठे ११, किंमत : रुपये २६.००

**असाधारण क्रमांक ५७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेत दिनांक ११ ऑगस्ट २०१७ रोजी पुरःस्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**L. A. BILL No. LIX OF 2017.**

A BILL

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA PUBLIC TRUSTS ACT.

**सन २०१७ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५९.**

**महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

१९५० चा २९. **ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम यात आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अडुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१७, असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियत करील अशा दिनांकास अंमलात येईल.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम २ मध्ये — १९५० चा २९.

(क) खंड (२) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

" (२अ) " लाभार्थी " याचा अर्थ, या अधिनियमानुसार केलेल्या विश्वस्तव्यवस्था विलेखामध्ये किंवा योजनेमध्ये आणि विश्वस्तव्यवस्थेच्या घटनेमध्ये विशद केलेल्या विश्वस्तव्यवस्थेच्या उद्दिष्टांनुसार कोणतेही लाभ घेण्यास हक्कदार असलेली कोणतीही व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये इतर व्यक्तींचा समावेश होणार नाही ; " ;

(ख) खंड (४) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (४) " न्यायालय " याचा अर्थ, मुंबई उच्च न्यायालय, असा आहे ; ".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ५ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (२अ) मध्ये, खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

" (क) जी व्यक्ती कायद्याद्वारे स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही विद्यापीठाची किंवा राज्य शासनाने याबाबतीत मान्यता दिलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाची कायद्याची पदवी धारण करीत असेल आणि जिने अशी पदवी धारण केल्यानंतर, धर्मादाय संस्थेत वरिष्ठ लिपिक किंवा लघु-टंकलेखक पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल अशा पदावर किमान पाच वर्षे इतकी सेवा केली असेल आणि जिने धर्मादाय आयुक्ताकडून विहित करण्यात आलेल्या नियमांनुसार घेण्यात येणारी विभागीय स्पर्धा परीक्षा उतीर्ण केली असेल, अशी व्यक्ती.".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २२ ची सुधारणा.

**४.** मुख्य अधिनियमाच्या कलम २२ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, धर्मादाय उप आयुक्तास किंवा सहायक धर्मादाय आयुक्तास, विनिर्दिष्ट कालावधीमध्ये बदल न कळविण्यास पुरेसे कारण होते याची खात्री पटल्यावर असा बदल कळविणाऱ्या विश्वस्ताने खर्चाची रक्कम प्रदान करण्याच्या अधीन राहून, असा बदल कळविण्यासाठी नव्वद दिवसांचा कालावधी वाढवून देता येईल आणि अशा खर्चाची रक्कम सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थापन निधीमध्ये जमा करता येईल. " ;

(ख) पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :—

" परंतु, विश्वस्तांची आणि व्यवस्थापकांची नावे व पत्ते किंवा विश्वस्त आणि व्यवस्थापक पदाच्या उत्तराधिकाऱ्यांची पद्धत यात बदल झाल्याच्या प्रकरणांत, धर्मादाय उपआयुक्तास किंवा सहायक धर्मादाय आयुक्तास, पंधरा कामकाजाच्या दिवसांच्या कालावधीमध्ये तो बदल तात्पुरता स्वीकारणारा आदेश देता येईल आणि अशा बदलाच्या संबंधात नोटीस प्रसिद्ध करून त्याद्वारे, ती नोटीस प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत आक्षेप मागविता येतील :

परंतु आणखी असे की, उक्त तीस दिवसांच्या कालावधीमध्ये कोणतेही आक्षेप न मिळाल्यास, पहिल्या परंतुकान्वये तात्पुरता बदल स्वीकारणारा आदेश अंतिम होईल आणि कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवहीत विहित रीतीने त्याची नोंद घेण्यात येईल :

परंतु तसेच, उक्त तीस दिवसांच्या कालावधीमध्ये कोणतेही आक्षेप मिळाल्यास, धर्मादाय उप आयुक्तास किंवा सहायक धर्मादाय आयुक्तास, आक्षेप दाखल केल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत या कलमाच्या पोट कलम (३) द्वारे तरतूद केल्याप्रमाणे, विहित रीतीने चौकशी करता येईल आणि निष्कर्ष नोंदविता येतील. " ;

(ग) पोट-कलम (३) मध्ये, " किंवा अर्ज " हा मजकूर वगळण्यात येईल.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३५ ची सुधारणा.

**५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३५ च्या पोट-कलम (१) मध्ये, दुसऱ्या परंतुकानंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु तसेच, जर कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेने दुसऱ्या परंतुकान्वये इतर कोणत्याही रीतीने पैसा गुंतविण्यासाठी परवानगी देणारा आदेश मागण्याकरिता धर्मादाय आयुक्ताकडे अर्ज केला असल्यास, धर्मादाय आयुक्त असा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत अशा अर्जावर निर्णय देईल आणि जर असे करणे व्यवहार्य नसेल तर, धर्मादाय आयुक्त त्याच्या कारणांची नोंद करील. ".

**६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३६ मध्ये,— सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३६ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१) मधील, खंड (क) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, धर्मादाय आयुक्तास, ज्या व्यवहारास खंड (अ), (ब) किंवा (क) अन्वये पूर्वमंजुरी दिलेली असेल असे व्यवहार पूर्ण करण्यापूर्वी, त्याखाली लादण्यात आलेल्या शर्तीमध्ये, त्यास योग्य वाटतील असे फेरबदल करता येतील :

परंतु आणखी असे की, अशी शर्त ही कोणत्याही कंत्राट किंवा अभिहस्तांतरण अंमलात आणण्याच्या कालमर्यादेच्या बाबतीतील असेल तर तेव्हा, अशा शर्तीमध्ये फेरबदल करण्याचा अर्ज हा असा विनिर्दिष्ट कालावधी संपण्यापूर्वी करण्यात येईल. " ;

(ख) पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :—

" (१अ) धर्मादाय आयुक्त या अधिनियमाअन्वये तीस वर्षांपेक्षा अधिक कालावधीचा कोणताही भाडेपट्टा मंजूर करणार नाही. " ;

(ग) पोट-कलम (२) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, अशी मंजुरी ती देण्यापूर्वी धर्मादाय आयुक्तांकडे लबाडी करून त्याद्वारे मिळविण्यात आली होती या कारणाखेरीज इतर कारणावरून अभिहस्तांतरण निष्पादित झाल्यानंतर या कलमाखाली अशी कोणतीही मंजुरी ही, मागे घेता येणार नाही. " ;

(घ) पोट-कलम (४) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (५) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पोट-कलम (१) अन्वये जेथे पूर्व मंजुरी न मिळाल्यामुळे विश्वस्तव्यवस्थेस, व्यक्तीच्या मोठ्या निकायास किंवा प्रामाणिक खरेदीदारास त्रास होत असेल, अशा अपवादात्मक किंवा असाधारण परिस्थितीमध्ये, धर्मादाय आयुक्तास,जर पुढील नमूद परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्याची खात्री पटल्यास, विश्वस्तांकडून झालेल्या विश्वस्थव्यवस्थेच्या मालमत्तेच्या हस्तांतरणास, कार्योत्तर मंजुरी देता येईल :—

(अ) अशा हस्तांतरणासाठी समर्थन करणारी आकस्मिक परिस्थिती निर्माण झाली होती,

(ब) उक्त हस्तांतरण करणे अनिवार्य झाले होते,

(क) विश्वस्तव्यवस्थेच्या हितासाठी हस्तांतरण आवश्यक झाले होते,

(ड) अशाप्रकारे हस्तांतरित केलेली मालमत्ता ही तज्ज्ञांद्वारे प्रमाणित केलेल्या अधिभावी बाजारमूल्यापेक्षा कमी नव्हते इतक्या मोबदल्यावर ती मालमत्ता हस्तांतरित केली होती,

(इ) सर्वोच्च मूल्य मिळण्याकरिता विश्वस्तांकडून वाजवी प्रयत्न करण्यात आले होते,

(फ) संपूर्ण व्यवहाराच्या कालक्रमात विश्वस्तांची कार्यवाही ही प्रामाणिक होती, आणि त्यांनी उक्त व्यवहारातून आर्थिक किंवा अन्य स्वरूपाचे कोणतेही लाभ घेतलेले नाहीत ; आणि

(ग) त्या त्या वेळी अंमलात असणाऱ्या कायद्यान्वये दस्तऐवजाची नोंदणी करणे आवश्यक असल्यास, नोंदणीकृत संलेख निष्पादित करून हस्तांतरण केले होते. ".

**७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ३६अ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३६अ ची सुधारणा.

" (३अ) पोट-कलम (३) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेथे पोट-कलम (३) अन्वये उद्देशित केलेली पूर्व परवानगी न मिळाल्यामुळे विश्वस्तव्यवस्था, लाभार्थी किंवा वास्तविक त्रयस्थ पक्षाला त्रास होत असेल, अशा अपवादात्मक आणि असाधारण परिस्थितीमध्ये, धर्मादाय आयुक्तास, विश्वस्तांना कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेकडून किंवा अनुसूचित बँकेकडून पैसे कर्जाऊ घेण्यास कार्योत्तर मंजुरी देता येईल.".

**८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४१ च्या पोट-कलम (२) मध्ये, " धर्मादाय आयुक्ताने दिलेला आदेश, हा कलम ७२ च्या तरतुदींना अधीन राहून " या मजकुराऐवजी, " धर्मादाय आयुक्ताने दिलेला आदेश " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ४१ ची सुधारणा.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ४१अ ची सुधारणा.

**९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४१अ च्या पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, पोट-कलम (१) अन्वये निदेश घेण्यासाठी कोणत्याही विश्वस्तव्यवस्थेच्या विश्वस्ताने कोणताही अर्ज केला असल्यास, धर्मादाय आयुक्त, तो अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत अशा अर्जावर निर्णय देईल आणि तसे करणे व्यवहार्य नसल्यास, धर्मादाय आयुक्त, त्याबाबतची कारणे नमूद करील. ".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ४१ड ची सुधारणा.

**१०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४१ड मध्ये,—

(क) पोट-कलम (२) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

" (२) (अ) धर्मादाय आयुक्त पोट-कलम (१) अन्वये कार्यवाही करण्याचे ठरवील तेव्हा, ज्या विश्वस्ताविरुद्ध किंवा व्यक्तीविरुद्ध कार्यवाही करण्याचे योजले असेल त्या विश्वस्ताविरुद्ध किंवा व्यक्तीविरुद्ध कार्यवाही करण्यासाठी जेव्हा प्रथमदर्शनी पुरावा आहे असे त्यास आढळून आले असेल फक्त तेव्हा धर्मादाय आयुक्तास अशा विश्वस्ताला किंवा व्यक्तीला नोटीस देता येईल.

(ब) खंड (अ) अन्वये जिला नोटीस देण्यात आली असेल असा विश्वस्त किंवा व्यक्ती, नोटीस प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत तिचे उत्तर सादर करील.

(क) खंड (अ) अन्वये देण्यात आलेल्या नोटिशीस उत्तर देण्यात त्या व्यक्तीने कसूर केल्यास किंवा धर्मादाय आयुक्तास ते उत्तर समाधानकारक न वाटल्यास, धर्मादाय आयुक्तास, उत्तर सादर केल्याच्या किंवा यथास्थिति, उत्तर सादर करण्यात कसूर झाल्याच्या पंधरा दिवसांच्या आत अशा व्यक्तीविरुद्ध दोषारोप ठेवील आणि अशा दोषारोपांना उत्तर देण्याची उक्त व्यक्तीला संधी दिल्यानंतर आणि तिच्याविरुद्ध आणि तिच्या बाजूने दाखल केलेल्या पुराव्यांचा विचार केल्यानंतर, दोषारोप ठेवल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत निलंबनाच्या, काढून टाकण्याच्या किंवा बडतर्फीच्या संदर्भातील आदेश देता येईल. धर्मादाय आयुक्तास विनिर्दिष्ट मुदतीत नोटीस देणे, आरोपपत्र दाखल करणे किंवा अंतिम आदेश देणे व्यवहार्य नसेल तर, तो त्याची कारणे नमूद करील.

(ड) निलंबन, काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे यासंबंधीच्या आदेशात, विश्वस्ताविरुद्ध लावलेले दोषारोप, त्याचा खुलासा, कोणताही असल्यास, आणि प्रत्येक दोषारोपावरील निष्कर्ष, त्याबद्दलच्या कारणांसह नमूद करण्यात येतील." ;

(ख) पोट-कलम (५) वगळण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (६) याच्या ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(६) जणू काही असा निर्णय हा, ज्याच्या निर्णयाविरुद्ध अपील दाखल होते असा, मूळ अधिकारितेचे न्यायालय असलेल्या एखाद्या जिल्हा न्यायालयाचा एक हुकूमनामाच होता असे समजून पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशाविरुद्ध तो आदेश दिल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल. ".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ४१इ ची सुधारणा.

**११.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४१इ मध्ये, पोट-कलमे (४), (६) आणि (७) वगळण्यात येतील.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ४७ ची सुधारणा.

**१२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ४७ मध्ये, पोट-कलम (५) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(५) जणू काही असा आदेश हा, ज्याच्या निर्णयाविरुद्ध अपील दाखल होते असा, मूळ अधिकारितेचे न्यायालय असलेल्या एखाद्या जिल्हा न्यायालयाचा एक हुकूमनामाच होता असे समजून पोट-कलम (२) खालील धर्मादाय आयुक्ताच्या अशा आदेशाविरुद्ध, तो आदेश दिल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल, अन्यथा तो आदेश अंतिम असेल. " .

**१३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५० मध्ये,— सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ५० ची सुधारणा.

(क) खंड (दोन) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात येईल,–

" (दोन) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या मालकीच्या किंवा मालकीची म्हणून सांगण्यात आलेल्या मालमत्तेचा ताबा परत मिळविण्यासाठी किंवा तिचा पाठपुरावा करण्यासाठी किंवा तिचे उत्पन्न वसूल करण्यासाठी किंवा विश्वस्त, माजी विश्वस्त, अन्यसंक्रामिती किंवा अन्य कोणतीही व्यक्ती, –मात्र त्यामध्ये सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेत प्रतिकूलरितीने कब्जा धारण करणारी अपप्रवेशी व्यक्ती, लायसन्सधारक किंवा भाडेकरू यांचा समावेश नसेल–यांच्याकडून अशा मालमत्तेचा किंवा तिच्या उत्पन्नाचा हिशेब मागणे याकरिता निदेश किंवा हुकुमनामा आवश्यक असेल त्याबाबतीत ; " ;

(ख) खंड (चार) मध्ये, उप खंड (ह) वगळण्यात येईल ;

(ग) तिसऱ्या परंतुकानंतर, पुढील **स्पष्टीकरण** जादा दाखल करण्यात येईल :–

" **स्पष्टीकरण**,– या कलमात, " न्यायालय " याचा अर्थ, बृहन्मुंबई मध्ये, शहर दिवाणी न्यायालय आणि अन्यत्र, जिल्हा न्यायालय, असा आहे.".

**१४.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५०अ मध्ये,— सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ५०अ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (१), (२) आणि (३) यांमध्ये " धर्मादाय आयुक्त " हा मजकूर ज्या ज्या ठिकाणी आला असेल त्या त्या ठिकाणी त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह " सहायक धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप-आयुक्त " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) पोट-कलम (४) ऐवजी, पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :—

"(४) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) अन्वये तयार केलेली किंवा पोट-कलम (३) अन्वये फेरबदल करण्यात आलेली योजना ही धर्मादाय आयुक्ताच्या कलम ७० खालील निर्णयास अधीन राहून, न्यायालयाच्या कलम ५० खालील हुकूमनाम्यान्वये निश्चित केलेल्या किंवा बदल केलेल्या योजनेप्रमाणे अंमलात येईल." .

**१५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५१ मध्ये,— सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ५१ ची सुधारणा.

(क) पोट-कलम (२) ऐवजी पुढील पोट-कलम दाखल करण्यात येईल :–

" (२) धर्मादाय आयुक्त पोट-कलम (१) अन्वये दावा दाखल करण्यास आपली संमती देण्याचे नाकारील तर, असी संमती मिळविण्याकरिता अर्ज करणाऱ्या व्यक्तींना, असा आदेश हा जिल्हा न्यायालयाच्या ज्या आदेशाविरूद्ध अपील दाखल करता येते असा आदेश असलेचे समजून उक्त आदेशाच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल, अन्यथा तो आदेश अंतिम असेल." ;

(ख) पोट-कलम (४) वगळण्यात येईल.

**१६.** मुख्य अधिनियमाच्या कलम ५५ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याचे कलम ५५ बदली दाखल करणे.

" **५५** (१) सहायक धर्मादाय आयुक्ताकडे किंवा धर्मादाय उप आयुक्ताकडे अर्ज करण्यात आला असता किंवा अन्यथा जर त्यांचे असे मत होईल की,— सदृश हेतू.

(अ) ज्या उद्देशासाठी सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निर्माण केली होती तो मूळ उद्देश निष्फळ झाला आहे ;

(ब) कोणत्याही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न किंवा कोणतीही अतिरिक्त शिल्लक रक्कम वापरण्यात आलेली नाही किंवा ती वापरली जाण्याचा संभव नाही ;

(क) धार्मिक प्रयोजनासाठी निर्माण केलेल्या विश्वस्तव्यवस्थेव्यतिरिक्त इतर सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या बाबतीत, सार्वजनिक हिताच्या दृष्टीने सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तीचा मूळ हेतू किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ज्या उद्देशाने निर्माण करण्यात आली होती तो उद्देश सर्वस्वी किंवा अंशतः पार पाडणे इष्ट, व्यवहार्य, वांच्छनीय, आवश्यक किंवा योग्य नसेल आणि सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता किंवा उत्पन्न किंवा त्याचा कोणताही भाग इतर कोणत्याही धर्मादाय किंवा धार्मिक उद्देशासाठी उपयोगात आणणे इष्ट असेल, किंवा

(ड) कलमे १० ते १३ यात नमूद केलेल्या कोणत्याही बाबतीत किंवा कलम ५४ अन्वये विश्वस्त म्हणून धारण केलेल्या धर्मादाय रकमांच्या विनियोजनासंबंधी धर्मादाय आयुक्ताचे निदेश आवश्यक आहेत ;

तर सहायक धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप-आयुक्त चौकशी केल्यानंतर समुचित आदेश देतील आणि त्याबाबत धर्मादाय आयुक्ताला अहवाल देतील.

(२) धर्मादाय आयुक्तास, स्वाधिकारे किंवा सहायक धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप आयुक्त यांच्या अहवालावर निदेश देता येईल आणि असे निदेश देताना, तो, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था निर्माण करणाऱ्या व्यक्तीचा मूळ हेतू किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था ज्या उद्देशाने निर्माण करण्यात आली होती तो उद्देश अंमलात आणील.

(३) धर्मादाय आयुक्तास, सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता किंवा उत्पन्न किंवा त्यांचा कोणताही भाग सदृश हेतूच्या तत्त्वावर, इतर कोणत्याही धर्मादाय किंवा धार्मिक उद्देशासाठी उपयोगात आणण्याविषयी निदेश देता येईल. असे करताना, धर्मादाय आयुक्ताने पूर्वी निश्चित करण्यात आलेली कोणतीही योजना बदलणे किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेच्या संबंधात पूर्वी देण्यात आलेला कोणताही हुकुमनामा किंवा आदेश याच्या अटींमध्ये किंवा सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेसंबंधीच्या लेखात असलेल्या शर्तीमध्ये फेरफार करणे हे कायदेशीर असेल.

(४) या कलमाच्या पोट-कलम (२) किंवा, यथास्थिति, पोट-कलम (३) अन्वये धर्मादाय आयुक्ताने दिलेला निर्णय किंवा आदेश हा, ज्याच्या विरुद्ध अपील दाखल करण्यात येते असा असलेल्या एखाद्या जिल्हा न्यायालयाचा एक हूकूमनामाच होता असे समजून, तो आदेश दिल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत, न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल, अन्यथा तो आदेश अंतिम असेल. ".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याचे कलम ५६ वगळणे.

**१७.** मुख्य अधिनियमाचे कलम ५६ वगळण्यात येईल.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याचे कलम ५६अ वगळणे.

**१८.** मुख्य अधिनियमाचे कलम ५६अ वगळण्यात येईल.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६८ ची सुधारणा.

**१९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६८ मध्ये,—

खंड (इ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येतील :

"(इ-१) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थांना वादमुक्त ठेवण्याकरिता, विश्वस्तव्यवस्थांच्या उत्तम प्रशासनासाठी उत्तेजन देणे व ते सुलभ करणे ;

(इ-२) ज्या विश्वस्ताने विश्वस्तव्यवस्थेकडे राजीनामा सादर केलेला आहे आणि तो इतर विश्वस्तांनी कळविलेला नाही आणि तो कलम २२ अन्वये कळविला असल्याचे समजून त्या विश्वस्ताचा राजीनामा स्वीकारणे आणि त्यासाठी आवश्यक चौकशी केल्यानंतर त्या राजीनाम्याबाबत निर्णय घेणे ;

(इ-३) कलम ५०अ खाली योजना तयार करणे किंवा योजनांमध्ये फेरबदल करणे ;

(इ-४) कलम ५५ अन्वये समुचित आदेश देणे आणि त्याबाबत कळविणे ; ".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ६९ ची सुधारणा.

**२०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६९ मध्ये,—

(क) खंड (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल,–

" (ब) कलमे २०, २२ व २८ अन्वये धर्मादाय उप-आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या निष्कर्षाविरुद्धची अपिले दाखल करून घेण्याचा व ती निकालात काढण्याचा अधिकार आणि ५०अ व ७९ अन्वये दिलेला निर्णयाविरुद्धची अपील दाखल करून घेण्याचा व ती निकाली काढण्याचा अधिकार ; " ;

(ख) खंड (ल ल) वगळण्यात येईल ;

(ग) खंड (न) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(न) विश्वस्तव्यवस्थेच्या पैशाचा सदृश हेतूच्या तत्त्वावर विनियोग करण्याविषयी विश्वस्तांना नोटीस देण्याचा व त्याबाबत समुचित आदेश देण्याचा अधिकार ;".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ७० ची सुधारणा.

**२१.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७० च्या पोट-कलम (१) मध्ये,—

(क) खंड (क-१) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(क-२) कलम ५०अ खालील आदेश ;";

(ख) खंड (ड) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :—

"(ड-१) कलम ७९ च्या पोट-कलम (१) खालील आदेश ;".

**२२.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७०अ मधील पोट-कलम (२) च्या खंड (ब) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल,— सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ७०अ ची सुधारणा.

“(ब) कलम ७० अन्वये केलेल्या अपिलात आदेश देण्यात आला असेल त्याबाबतीत.”.

**२३.** मुख्य अधिनियमाचे कलम ७१ वगळण्यात येईल. सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याचे कलम ७१ वगळणे.

**२४.** मुख्य अधिनियमाचे कलम ७२ वगळण्यात येईल. सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याचे कलम ७२ वगळणे.

**२५.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७३ मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :— सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ७३ ची सुधारणा.

“परंतु, अधिनियमाच्या कलम २२ अन्वये चौकशी करत असताना, सहायक धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप आयुक्त जर त्याने जबानीदाराला उचित प्रकरणामध्ये परवानगी दिली असेल तर, जबानीदाराच्या उलट-तपासणीस अधीन राहून, फक्त शपथपत्रांच्या नमुन्यामध्ये पुराव्याची नोंद करील.”

**२६.** मुख्य अधिनियमामध्ये कलम ७४अ ऐवजी, पुढील कलम बदली दाखल करण्यात येईल :— सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याचे कलम ७४अ बदलीदाखल करणे.

“**७४अ.** जेव्हा राज्य शासन तसा निदेश देईल तेव्हा, धर्मादाय आयुक्त, धर्मादाय सह-आयुक्त किंवा लेखा संचालक किंवा कोणताही धर्मादाय उप आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त हा, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ची कलमे ३४५ आणि ३४६ यांच्या अर्थानुसार दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल.”. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याची कलमे ३४५ ते ३४६ यांच्या अर्थानुसार धर्मादाय आयुक्त, धर्मादाय सह-आयुक्त, धर्मादाय उप आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त इ. दिवाणी न्यायालय असल्याचे मानणे.

१९७४ चा २.

**२७.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७७ ऐवजी, पुढील कलम बदली दाखल करण्यात येईल :— सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याचे कलम ७७ बदली दाखल करणे.

“**७७.** या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदींन्वये, देय असलेल्या सर्व रकमा, जर दिल्या नाहीत तर, कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, त्या जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसूल करता येतील.”. अधिनियमांन्वये किंवा नियमांन्वये देय असलेल्या रकमांची वसुली.

**२८.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७९ ऐवजी, पुढील कलम बदली दाखल करण्यात येईल :— सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याचे कलम ७९ बदली दाखल करणे.

“**७९.** (१) एखादी विश्वस्तव्यवस्था अस्तित्वात आहे किंवा नाही आणि अशी विश्वस्तव्यवस्था ही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था आहे किंवा कसे किंवा विशिष्ट मालमत्ता ही अशा विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता आहे किंवा कसे या संबंधीच्या कोणत्याही प्रश्नाचा निर्णय या अधिनियमान्वये तरतूद केल्याप्रमाणे, धर्मादाय उप आयुक्त किंवा सहायक धर्मादाय आयुक्त करील. एखादी मालमत्ता ही सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता म्हणून ठरविण्यासंबंधीचा निर्णय.

(२) सहायक धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप आयुक्त याच्या अशा निर्णयाविरुद्ध कलम ७० अन्वये धर्मादाय आयुक्ताकडे अपील दाखल करता येईल.”.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याचे कलम ७९कक ची सुधारणा.

**२९.** मुख्य अधिनियमाच्या कलम ७९कक मध्ये, पोट-कलम (३) ऐवजी, पुढील पोट-कलम बदली दाखल करण्यात येईल :—

" (३) पोट-कलम (२) अन्वये भरपाई देण्याविषयी दिलेला आदेश हा धर्मादाय उप आयुक्ताने किंवा सहायक धर्मादाय आयुक्ताने दिला असेल तर धर्मादाय आयुक्ताकडे याविरुद्ध अपील करता येईल ; ज्याचा निर्णय अंतिम असेल आणि कलम ७० च्या तरतुदी, अशा अपिलास लागू होतील. ".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याचे कलम ८२ बदली दाखल करणे.

**३०.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८२ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल :—

या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी.

" **८२.** महानगर दंडाधिकारी किंवा प्रथम श्रेणी दंडाधिकारी याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाच्या कोणत्याही न्यायालयाला या अधिनियमान्वये शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधांची न्यायचौकशी करता येणार नाही. ".

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ८४ ची सुधारणा.

**३१.** मुख्य अधिनियमाच्या कलम ८४ च्या, पोट-कलम (२) मध्ये,—

(क) खंड (ओ) वगळण्यात येईल ;

(ख) खंड (यू) वगळण्यात येईल.

सन १९५० चा अधिनियम क्रमांक २९ याच्या अनुसूची ब ची सुधारणा.

**३२.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या अनुसूची ब मध्ये,—

(क) कलम ५०अ याच्याशी संबंधित नोंदीमध्ये, स्तंभ (२) मध्ये " धर्मदाय आयुक्त " या मजकुराऐवजी, " सहायक धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप आयुक्त " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) कलम ५१ (१) याच्याशी संबंधित नोंदीनंतर, पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

" ५१(२) धर्मादाय आयुक्ताच्या निर्णयाविरुद्ध न्यायालयाकडे करावयाचे अपील रु. १०० " ;

(ग) कलम ५५ याच्याशी संबंधित नोंदीमध्ये, स्तंभ (२) मध्ये, " न्यायालयाकडे " या मजकुराऐवजी, " सहायक धर्मादाय आयुक्त किंवा धर्मादाय उप-आयुक्त यांच्याकडे " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(घ) कलम ५६अ याच्याशी संबंधित नोंद वगळण्यात येईल ;

(ङ) कलम ७० (१) यांच्याशी संबंधित नोंदीमध्ये, स्तंभ (२) मध्ये " किंवा त्याने कलम ५४ चे पोट-कलम (३) अन्वये दिलेल्या आदेशाविरुद्ध " या मजकुराऐवजी, " किंवा त्याने कलम ५०अ, कलम ५४ चे पोट-कलम (३) आणि कलम ७९ चे पोट-कलम (१) अन्वये दिलेल्या आदेशाविरुद्ध " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(च) कलम ७१(१) याच्याशी संबंधित नोंद वगळण्यात येईल ;

(छ) कलम ७२(१) याच्याशी संबंधित नोंद वगळण्यात येईल ;

(ज) कलम ७२(४) याच्याशी संबंधित नोंद वगळण्यात येईल.

शंका निरसन.

**३३.** शंकेचे निरसन करण्यासाठी, याद्वारे असे घोषीत करण्यात येते आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१७ (यात यापुढे ज्याचा निर्देश " २०१७ चा उक्त सुधारणा अधिनियम " असा करण्यात आला आहे) याद्वारे सुधारणा केलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा २०१७ चा उक्त सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास कोणत्याही दिवाणी न्यायालयासमोर प्रलंबित असलेले अर्ज किंवा अपिले यांच्यावर परिणाम होणार नाही ; आणि २०१७ च्या उक्त सुधारणा अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी लागू असलेल्या कायद्यानुसार असे न्यायालय अशा अर्जांवर किंवा अपिलांवर कार्यवाही करील व ते निकालात काढील.

१९५० चा २९.
२०१७ चा महा.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम (१९५० चा २९), महाराष्ट्र राज्यातील सार्वजनिक धार्मिक व धर्मादाय विश्वस्तव्यवस्थांच्या प्रशासनाचे विनियमन करतो व त्याकरिता अधिकाधिक चांगल्या तरतुदी करण्याची सुनिश्चिती करतो. उक्त अधिनियमान्वये राज्यात ८ लाखांहून अधिक विश्वस्तव्यवस्थांची नोंदणी करण्यात आली आहे.

जरी, उक्त अधिनियमात विश्वस्तव्यवस्थांचे विनियमन करण्यासाठी व्यापक तरतुदींचा अंतर्भाव असला तरी, असे निदर्शनास आले आहे की, अधिनियमाच्या विविध तरतुदींखालील कार्यवाही ही, बरेच दीर्घकाळ प्रलंबित राहते आणि त्याच्या परिणामी, सार्वजनिक धार्मिक व धर्मादाय उद्दिष्टपूर्तीच्या प्रक्रियेत अडथळे येतात.

२. उक्त अधिनियमाच्या कलम १७ अन्वये ठेवलेल्या नोंदवह्यांमध्ये नोंदी करण्यासंबंधातील विशेषतः बदल कळविण्याच्या विशेषकरून अविवादित बदल कळविण्याच्या संबंधातील प्रकरणे, अधिनियमाखालील प्राधिकाऱ्यांसमोर मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहतात त्यामुळे राज्य शासनास काळजी आहे. म्हणून, सहायक धर्मादाय आयुक्ताद्वारे किंवा धर्मादाय उप आयुक्ताद्वारे नोंद बदल कळविण्याची प्रकरणे त्वरेने निकालात काढण्याकरिता आणि तसेच, उक्त अधिनियमाखालील इतर प्राधिकाऱ्यांसमोरील कार्यवाही त्वरेने निकाली काढण्याकरिता, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमात सुधारणा प्रस्तावित करण्यासाठी दिनांक १३ जानेवारी २०१६ रोजीच्या आदेशानुसार श्री. ए. जे. ढोलकिया, धर्मादाय आयुक्त (सेवानिवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली आणि श्री. एस. बी. सावळे, धर्मादाय आयुक्त व इतर अधिकारी यांचा समावेश असणारी एक समिती शासनाने घटित केली होती. या समितीने आपला अहवाल दिला असून त्याद्वारे उक्त अधिनियमात व्यापक सुधारणा सुचविलेल्या आहेत.

३. आणखी असे निदर्शनास आले होते की, उक्त अधिनियमाद्वारे अपील, अर्ज व पुनरीक्षण यासाठी प्राधिकारी व न्यायालये यांची अधिकारश्रेणी निर्माण केली आहे. उदाहरणार्थ, धर्मादाय आयुक्ताचे आदेश, जिल्हा न्यायालय, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण आणि विभागीय आयुक्त यांच्याकडे आव्हान देण्याच्या अधीन राहून, देण्यात येतात. जिल्हा न्यायाधीशाच्या दर्जाचे मोठ्या संख्येतील न्यायिक अधिकारी जेव्हा धर्मादाय आयुक्ताची व धर्मादाय सहआयुक्ताची कार्ये पार पाडीत असतात तेव्हा अधिनियमाखालील कार्यवाहींची आणि मंचाची ही बहुविधता असमर्थनीय तसेच, ती विसंगत असल्याचे दिसून येते. विदर्भ युवक कल्याण संस्था विरुद्ध संदीप राम मेघे (दिवाणी पुनरीक्षण क्र. ८४/२०१५) या प्रकरणामध्ये, मा. मुंबई उच्च न्यायालयाने असे मत नोंदविले आहे की, " खासकरून, जेव्हा जिल्हा न्यायाधीशाच्या दर्जाचे न्यायिक अधिकारी हे धर्मादाय सहआयुक्त म्हणून पीठासीन असतात तेव्हा त्यांना दिवाणी न्यायालय, जिल्हा न्यायालय, महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांच्याकडील काही वाद प्रकारांचे अभिनिर्णय करण्याची परवानगी देणे हे, काहीसे असंगत आहे. त्यामुळे गंभीर समस्या निर्माण होते. " म्हणून मा. उच्च न्यायालयाने अशी शिफारस केली आहे की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० खालील जेथे सर्व प्रकारच्या विवादांवर सहकारी न्यायालये किंवा अपील न्यायालये निर्णय करतात, त्याच धर्तीवर, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमाखाली तशाच प्रकारची न्यायव्यवस्था निर्माण करण्याची आवश्यकता आहे.

४. उक्त अधिनियमाची अंमलबजावणी करणाऱ्या संघटने प्राधिकरणांचे कामकाज त्वरेने व जलद निकाली काढण्याच्या आणि विविध प्राधिकरणे किंवा न्यायपीठ, यांना दूर ठेवून त्यास कालमर्यादा घालून देऊन त्यासाठी शक्य त्या तरतुदींचा समावेश करून, अधिनियमाअन्वये प्राधिकरणांपुढील कार्यवाहीचे सुसूत्रीकरण करण्याची उद्दिष्टे विचारात घेता, उक्त अधिनियमाच्या तरतुदींमध्ये निश्चितपणे सुधारणा करण्याची आवश्यकता दिसून आली होती आणि त्यानुसार इतर गोष्टींबरोबर पुढील सुधारणा प्रस्तुत करण्यात येत आहे :—

(क) असे दिसून आले होते की, धर्मादाय संस्थेवरील जिल्हा न्यायालयाच्या पर्यवेक्षकीय अधिकारितेचा, कार्यवाहीचा निर्णय दीर्घकाळ लांबवण्यासाठी दुरूपयोग होत होता. म्हणून कलम २(४) खालील " न्यायालयाची " व्याख्या, " मुंबई उच्च न्यायालय " या अर्थाने, त्यात सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे. परिणामी, कलम ७२ अन्वये धर्मादाय आयुक्तांच्या आदेशांविरुद्ध अर्जाची उपाययोजना वगळण्याचे प्रस्तावित केले आहे.

(ख) नोंदीत बदल कळविण्याच्या प्रकरणात,—

(एक) कलम २२ च्या पोट-कलम (१) यात एक परंतुक जादा दाखल करून त्याद्वारे बदल कळविण्याच्या ९० दिवसांच्या कालावधीत वाढ करण्यास मुभा देण्यासाठी समर्थकारी तरतूद करणे,

(दोन) कलम २२ खालील बदल कळविण्यातील प्रलंबितता दूर करण्यासाठी व शीघ्र गतीने निपटारा होण्यासाठी, विनिर्दिष्ट कालावधीमध्ये बदल कळविण्याचा निर्णय अनिवार्य करण्यासाठी, आणि त्याचबरोबर, अहवालातील बदल तात्पुरता स्वीकारण्यासाठी एका यंत्रणेची तरतूद करण्याकरिता आणि अविवादित बाबींमधील बदल तात्पुरता स्वीकारण्याच्या आदेशासाठीचे अंतिम निर्णय त्यास जोडणे,

यासाठी पोट-कलम (२) मध्ये विवक्षित परंतुके जादा दाखल करण्याचे प्रस्तावित केले आहे.

(ग) सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे मालमत्तेचे हस्तांतरण व विनियोग यांकरिता मंजुरी देतेवेळी लादलेल्या शर्तीमध्ये फेरबदल करणे आणि लबाडीच्या कारणाखेरीज, अभिहस्तांतरणाच्या निष्पादनानंतर मंजुरी देण्याच्या आदेशाला उशिराने आव्हान देण्यावर निर्बंध लादणे धर्मादाय आयुक्तांना शक्य व्हावे यासाठी कलम ३६ मध्ये तरतुदी करणे ;

(घ) पूर्व मंजुरी न मिळाल्यामुळे अत्यंत गंभीर अडचणी निर्माण होतात अशा अपवादात्मक आणि असाधारण परिस्थितीमध्ये, कलम ३६ आणि ३६अ यांअन्वये कार्योत्तर मंजुरी देण्याचे प्राधिकार धर्मादाय आयुक्ताकडे विनिहित करणे ;

(ङ) कलम ४१अ (१) अन्वये निदेश मागणाऱ्या अर्जांवर निर्णय करण्यासाठी कालमर्यादेची तरतूद करणे ;

(च) कलम ४१ड अन्वये विश्वस्तांचे निलंबन, काढून टाकणे आणि बडतर्फीच्या अधिकारांचा वापर करण्याच्या कार्यपद्धतीत सुसूत्रता आणणे आणि त्यासाठी कालमर्यादेची तरतूद करणे ;

(छ) कलम ५०अ अन्वये योजना तयार करण्याच्या किंवा त्यात फेरबदल करण्याचे आणि धर्मादाय आयुक्तांकडे अपील करण्याच्या अधीन राहून आदेश काढण्याचे प्राधिकार सहाय्यक धर्मादाय आयुक्ताकडे किंवा धर्मादाय उपायुक्तांकडे विनिहीत करणे ;

(ज) विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता किंवा उत्पन्नाचा सदृश हेतूने वापर करण्याच्या बाबतीतील जिल्हा न्यायालयांच्या पर्यवेक्षकीय आणि सल्लागार अधिकारिता काढणे आणि सर्व बाबतीत कलम ५५ खालील अधिकारांचा वापर करण्यासाठी धर्मादाय आयुक्ताला अधिकार प्रदान करणे ;

(झ) महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण आणि विभागीय आयुक्त यांच्या समोरील कार्यवाही काढून घेणे.

उपरोक्त समावेशन वगळणे, आणि बदलीदाखल करण्याच्या अनुषंगाने, उक्त अधिनियमाच्या अनुसूची ब सह विविध कलमांमध्ये यथोचित अनुषंगिक सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

५. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,		**देवेंद्र फडणवीस,**
दिनांक १० ऑगस्ट २०१७.		मुख्यमंत्री.

## वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे ज्ञापन.

या विधेयकात वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे पुढील प्रस्ताव अंतर्भूत आहेत :—

**खंड १ (२).—** या खंडान्वये, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, हा अधिनियम ज्या दिनांकास अंमलात येईल तो दिनांक नियत करण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

**खंड ३.—** महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियमाच्या कलम ५ च्या पोट-कलम (२अ) च्या खंड (क) बदली दाखल करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, जी व्यक्ती कायद्याद्वारे स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही विद्यापीठाची किंवा याबाबतीत राज्य शासनाने मान्यता दिलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाची कायद्याची पदवी धारण करीत असेल आणि जिने अशी पदवी धारण केल्यानंतर, धर्मादाय संस्थेत वरिष्ठ लिपिक किंवा लघु-टंकलेखक पदाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसेल अशा पदावर किमान ५ वर्षे इतकी सेवा केली असेल अशी व्यक्ती, सहायक धर्मादाय आयुक्ताच्या पदाकरिता अर्ज करण्यासाठी पात्रता ठरविण्याकरिता विभागीय स्पर्धा परीक्षा आयोजित करण्यासाठी नियम करण्याचा अधिकार धर्मादाय आयुक्ताकडे घेण्यात आला आहे.

**खंड ४.—** उक्त अधिनियमाच्या कलम २२ च्या पोट-कलम (२) मध्ये परंतुके जादा दाखल करण्याचा हेतू असणाऱ्या या खंडान्वये, सहायक धर्मादाय आयुक्ताद्वारे किंवा धर्मादाय उप-आयुक्ताद्वारे चौकशी करण्याची रीत नियमांद्वारे विहित करण्याचा आणि संबंधित नोंदवहीमध्ये विश्वस्तांची आणि व्यवस्थापकांची नावे व पत्ते किंवा विश्वस्त आणि व्यवस्थापक पदाच्या उत्तराधिकाऱ्याची पद्धत यातील बदलाबाबतच्या नोंदी घेण्याचा अधिकार राज्य शासनाकडे घेण्यात आला आहे.

२. वैधानिक अधिकार सोपविण्यासंबंधीचे वर उल्लेखिलेले प्रस्ताव सामान्य स्वरूपाचे आहेत.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक ११ ऑगस्ट २०१७.

**अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.